# नियमित दिवणी दावा क्र.४४/२०२१ मधील नि.क्र.७९ वरील आदेश

## (पारित दिनांक १० ऑक्टोबर, २०२४)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी 'दिवाणी प्रक्रिया संहिता' आदेश ७ नियम ११(ड) अन्वये प्रस्तुतचा दावा फेटाळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा हा वाटपाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यातील वाद मिळकत २४८/२ ही भोगवटा वर्ग–२ ची जमिन असुन सदर जमिन पुनर्वसनाचे तरतुदीनुसार सरकारकडुन मिळाली आहे. सदर जमिनीचे वाटप प्रतिवादी क्र.१ यांना पश्चिमेकडील १ एकर व वादी यांना पुर्वेकडील १ एकर वाटुन देण्यात आली होती व सदर जमिनीवर बाकी वारसांची नावे पोकळीस्थ आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांचे क्षेत्राशी वादीचा संबंध नाही. प्रतिवादींचे म्हणणेनुसार दि.०८/१२/२००५ रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांचा प्रतिज्ञालेख झाला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ व २ तसेच मयत वादी ज्ञानदेव यांचे वडील साहेबराव यांचे मृत्युनंतर मौजा मलठण, येथील गट क्र.१९२ क्षेत्रफळ १ हे ७६ आर जमिन प्रतिवादी क्र.२ यांना देण्यात आली. त्यामुळे गट क्र.२४८ मध्ये प्रतिवादी क्र.२ पोपट वाघमोडे यांनी हिस्सा नको असे कबुल केले. प्रतिवादींचे म्हणणेनुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांचे मयत चुलते निवृत्ती यांनी त्याचे हयातीत सन १९९१ मध्ये गट क्र.१८७ मधील १ हे. ३० आर क्षेत्र प्रतिवादी क्र.१ विठ्ठल वाघमोडे यांना व गट क्र.१९२ मधील ० हे. ७६ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.२ यांना वाटुन दिले. सदर वाटप हे तहसिलदार यांचेकडील वाटप/एस/आर/३९२/९० मधील

आदेशान्वये झाले आहे. त्यावेळी सदर वादींनी हरकत घेतली नाही. प्रतिवादींचे म्हणणेनुसार सदर वादींना दावा दाखल करण्याचा व वाटप मागण्याचे कोणतेही कारण उरलेले नाही. सन १९९० सालापासुन ते आजपर्यंत वादींनी कसलाही दावा दाखल केला नाही. प्रतिवादींचे म्हणणेनुसार सदर वादीने गट क्र.१०५/७ मधील २ हे. ४० आर जमिन एकत्र उत्पन्नातुन घेतली. परंतु, सदर जमिन प्रस्तुत दाव्यामध्ये सामिल केली नाही. मयत वादी ज्ञानदेव यांनी दि.०८/१२/२००५ रोजी प्रतिज्ञापत्र देवुन प्रतिवादी क्र.२ पोपट वाघमोडे यांना गट क्र.१९२ मधील ० हे. ७६ आर क्षेत्र वाटुन दिल्याचे कबुल केले. तसेच गट क्र.२४८/२ मध्ये प्रतिवादी क्र.४ व ५ यांनी हक्कसोडपत्र केल्याने सदरचे दावा मिळकतीचे वाटप पुर्वीच झाले असल्याने सदरचा दावा मुदतबाहय असुन दावा दाखल करण्यास वादीला कोणतेही कायदेशिर कारण घडले नसताना काल्पनिक कारण देवुन खोटा दावा दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी सदरचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे फेटाळण्याची/रद्द करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जावर निशाणी ८१ वरील वादीचे म्हणणेनुसार त्यांनी सदरचा अर्ज बेकायदेशिर असुन दाव्याचे कामकाज लांबवण्याकरीता दाखल केला असल्याचे नमुद केले. वादीने सदर प्रतिवादींनी दाखल केलेला दि.०८/१२/२००५ रोजीचा प्रतिज्ञालेख हा बोगस, बेकायदेशिर व चुकीचा असुन त्यावरील सही मयत ज्ञानदेव यांची नसुन प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संगनमत करुन बनवलेला असल्याने नाकबुल केला व तो प्रतिवादींनी शाबीत करण्याची विनंती केली. तसेच वादीचे म्हणणेनुसार सदर प्रतिज्ञालेख बोगस असल्याने वादीने दि.२६/०३/२०२१ रोजी दौंड पोलिस स्टेशनमध्ये फसवणुकीची तक्रार दिली आहे. वादीचे म्हणणेनुसार अद्यापपर्यंत

दावा मिळकतीचे त्यांच्यामध्ये व प्रतिवादींमध्ये वाटप झाले नाही. तसेच तहसिलदार दौंड यांचेकडील हुकूम क्र.हनो/वाटप/एस.आर./३९२/९०, दि.१०/०१/१९९१ रोजीच्या आदेशावर वादीने दाव्यामध्ये हरकत घेतली आहे व सदरचा आदेश पोकळीस्थ व बेकायदेशिर असल्याने तो वादीचे हिश्यावर बंधनकारक नसल्याचा जाहीर ठराव करुन मिळण्याची मागणी केली आहे. वादीने दावा कलम ९ मध्ये दाव्याचे कारण नमुद केले आहे. वादीचे म्हणणेनुसार गट क्र.१०५/७ ही जमिन गोरक्षनाथ ज्ञानदेव वाघमोडे यांचे खरेदी मालकी हक्क वहिवाटीची असुन त्याच्याशी प्रतिवादींचा कोणताही संबंध नाही. प्रतिवादी क्र.३, ४ व ५ या बहिणींचे संपुर्ण दावा मिळकतीतुन हक्कसोडपत्र झालेले नाही. त्यामुळे उपरोक्त कारणांचा विचार करुन वादींनी सदरचा प्रतिवदींचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादींचे कथन व पटलावरील कागदपत्रे पाहता वाद मुद्दे निश्चित करुन त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(ड) अन्वये नामंजुर करणेस पात्र आहेत काय? | **....नाही** |
| २) | आदेश काय? | **अर्ज नामंजुर करणेत येत आहे.** |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करिताः</u>**

५. दोन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रित देण्यात येत आहे. प्रस्तुतचा दावा वादीने जाहीर ठराव, वाटप व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. वादींचे म्हणणेनुसार सदर प्रकरणातील दावा मिळकती गट क्र.१० मधील ० हे. ६४ आर, गट क्र.२४८/२ मधील ० हे. ८० आर, गट क्र.१८७ मधील १ हे. २९ आर, गट क्र.१९२ मधील ० हे. ७६ आर असुन आजतागायत वादी व प्रतिवादी यांच्यात वाटप झालेले नाही. वादीचे विधिज्ञांनी त्यांचे युक्तीवादात त्यांचे अर्जातील मजकुर पुनराच्चारीत केला व प्रतिवादींचा अर्ज हा बनावट व खोटा असुन वेळकाढुपणा करण्याकरीता दाखल केल्याचे नमुद करुन नामंजुर करण्याची विनंती केली. प्रतिवादीचे विधिज्ञांनी त्यांचे युक्तीवादात संपुर्ण दावा व जबाबदाव्याचे तथ्य सांगुन प्रकरणातील दावा मिळकतीच्या अनुशंगाने सन १९९० साली वाटप झाले असल्याने तसेच बहीणींनी त्यांचा हक्क सोडल्याचेदेखील नमुद केले. प्रतिवादींचे म्हणणेनुसार सदरचा वादीचा दावा दाखल करण्यास वादीला कोणतेही कारण घडले नाही व सदरचा दावा हा मुदतबाहय असल्याने त्यांनी सदरचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये नामंजुर करण्याची विनंती केली.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ चे अवलोकन केले. सदरचा अर्ज हा वादीस दावा दाखल करण्याचे कारण नाही (No cause of action) व दावा मुदतबाहय (barred by limitation) व कायदेशिर तरतुदींना धरुन नसल्याने फेटाळण्याची विनंती केली आहे. त्या

अनुशंगाने निशाणी १ चे अवलोकन केले असता सदरचा दावा हा वाटप होवुन मिळणेकरीता दाखल केला आहे. त्या अनुशंगाने वादीने त्याचे दावा परीच्छेद क्र.९ मध्ये दाव्यास काय कारण घडले याबाबत नमुद केले आहे. सदरचा दावा हा वाटपाचा असल्याने व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये आदेश करताना वादीच्या दाव्यातील कारणाचा या टप्यामध्ये पुराव्याअभावी ते कारण चुकीचे आहे, असा निष्कर्ष काढता येणार नाही. तसेच प्रतिवदींनी सदर दावा मिळकतीचे सन १९९० साली तहसिलदार दौंड यांचेसमक्ष वाटप झाल्याचे नमुद करुन सदरचा दावा मुदतबाहय असल्याचा युक्तीवाद केला. प्रकरणात सदर तहसिलदार दौंड यांचेकडील हुकूम क्र.हनो/वाटप/एस.आर./३९२/९०, दि.१०/०१/१९९१ च्या अदेशाची प्रत प्रकरणात दाखल नाही. त्यामुळे आजरोजी सदर वादी हे वाटपावेळी पक्षकार होते किंवा कसे? याबाबत निष्कर्ष काढता येणार नाही. तसेच दावा दाखल करण्यास मुदत होती किंवा नाही, हा तथ्य व कायद्याच्या (Mix question fact and law) या संज्ञेत मोडतो. त्यामुळे तो कायदा व तथ्यांचा संमिश्र प्रश्न वादीला दावा दाखल करण्यास मुदत होती किंवा नाही, याकरीता पुरावा घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या कारणास्तव वादीचा दावा फेटाळता येणार नाही.

७. प्रकरणात प्रतिवादीतर्फे मयत वादी ज्ञानदेव व प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यातील दि.०८/१२/२००५ रोजीचा प्रतिज्ञालेख अभिलेखावर दाखल करण्यात आला व सदर प्रतिज्ञालेखातील मजकुर विचारात घेउन सदर वादी व प्रतिवादींमध्ये वाटप झाल्याचे न्यायालयाने गृहीत धरावे असा प्रतिवादींनी युक्तीवाद केला .त्या अनुशंगाने वादीने सदर प्रतिज्ञालेख बनावट असुन त्यावरील सही त्यांची नसल्याचा बचाव घेतला. त्यामुळे सदर प्रतिज्ञालेख पुराव्याअंती

सिध्द करण्याची प्रतिवादीची जबाबदारी आहे. त्यामुळे सदर प्रतिज्ञालेखाचा दाव्याचा या टप्प्यात विचार करुन वादीचे व प्रतिवादींचे यापुर्वी वाटप झाले आहे, असा निष्कर्ष काढुन सदरचा वादीचा दावा दाव्यास कारण नाही (cause of action) व (barred by limitation) एखाद्या कायद्याची बाधा आल्याने चालु शकत नाही, या तत्वांनुसार फेटाळता/नामंजुर करता येणार नाही.

८. प्रतिवादींचे म्हणणेनुसार दावा मिळकतीच्या अनुशंगाने त्यांच्या बहिणींनी हक्कसोड पत्र दि.१९/०३/२०२० रोजी केले आहे. सदर हक्कसोड पत्र क्र.१२४१/२०२० असुन सदर हक्कसोडपत्र सन २०२० मध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यात पुर्वीच वाटप झाले आहे, हा प्रतिवादींनी सदर दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार दावा नामंजुर करण्याकरीता दिलेले कारण आजरोजी संयुक्तिक वाटत नाही. तसेच आम्ही दावा मिळकतीच्या काही गट क्रमांकावर वादी व प्रतिवादींची नावे सामाईक आहेत. उपरोक्त चर्चेवरुन सदरचा प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करणे न्यायोचित आहे. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता सदरचा अर्ज विनाखर्च नामंजुर करणे न्यायोचित आहे. करीता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ च्या अनुशंगाने खालील आदेश पारीत करत आहे –

## आदेश

प्रतिवादीचा निशाणी ७९ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2024.10.11 11:04:58 +0530

ठिकाणः दौंड,
दिनांक १०/१०/२०२४

**(एस.एन. पाटील)**
३ रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, ता.दौंड, जि.पुणे

# प्रमाणपत्र

मी शपथेवर सांगते की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | एम.एम. चिंतले, |
| न्यायालयाचे नांव | :: | एस.एन. पाटील,<br>३रे सह दिवाणी न्यायाधीश, दौंड<br>ता.दौंड, जि.पुणे |
| निकाल दिनांक | :: | १०/१०/२०२४ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | १०/१०/२०२४ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | ११/१०/२०२४ |